Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

## November - 2020

ISSUE No – CCLXI (261)

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.S.N.Jadhavar
Editor :
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ..Dist. BEED.

Dr.R.M.Hajari
Executive Editor:
Principal
Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.


Aadhar International Publications
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 22 | छत्रपती शिवरायांच्या जडणघडणीत राष्ट्रमाता जिजाऊंचे योगदान **प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे** | 89 |
| 23 | स्वातंत्र्योत्तर काळातील महिला संघटनाच्या आंदोलनाचे स्वरुप समाजशास्त्रिय अध्ययन प्रा डॉ रविंद्र विठोबा विखार | 95 |
| 24 | थेरीगाथा - एक बंधमुक्त प्राचीन स्त्री जीवन **विजय ज्ञानोबा साळवे / डॉ बाबासाहेब दगडू कोकाटे/डॉ भदंत एम सत्यपाल महाथेरो** | 98 |
| 25 | आधुनिक हिन्दी साहित्य का इतिहास **वेदिका यादनलाल बनोठे** | 101 |
| 26 | भारतातील सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेत महिलाचा सहभाग **प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले** | 107 |
| 27 | क्रीडा क्षेत्र आणि महिला **डॉ. प्रफुल प्रकाश वराळे** | 109 |
| 28 | होळकर घराण्यातील धुरंधर राज्यकर्ती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची सामाजिक कार्यसपदा डॉ सौ वंदना राजेश शिंदे | 112 |
| 29 | स्त्रीवादी कविता **डॉ. शिवराज काचे** | 122 |
| 30 | इतिहासातील कर्तबगार स्त्रिया कु. फुगे कविता रामहारी | 126 |
| 31 | अहिल्याबाई होळकर आणि लोककल्याणकारी कार्य प्रा जयंत विरुळकर | 132 |
| 32 | 'मुखेडच्या 'दशरथेश्वर' मंदिरावरील एकमेवाव्दितीय नायिकाप्रधान कामशिल्प' प्रा डॉ अरविंद सोनटक्के | 137 |
| 33 | थिमक्काचे कार्य महानरू तुम्हा आम्हाला पर्यावरण संवर्धनाचा मार्ग दाखवतेय छान डॉ. गंगणे जीवन सुदामराव | 143 |
| 34 | ताराबाई शिंदे यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान **डॉ.जी.व्ही.गट्टी** | 148 |
| 35 | भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाची आवश्यकता व महत्त्व : एक अभ्यास **डॉ.बालासाहेब शिवाजी पवार** | 150 |
| 36 | स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान दिपक हिंदूराव तडाखे /डॉ. रमेश दत्तात्रय गंगथडे | 153 |
| 37 | भारतीय इतिहासातील स्त्रीयांवर एक दृष्टीक्षेप **प्रा.डॉ. दिलीप तुकाराम कदम** | 157 |
| 38 | स्वराज्याच्या स्थापनेतील राजमाता जिजाबाई यांचे योगदान **प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे** | 160 |
| 39 | १९ व्या शतकातील स्त्री : कार्य कर्तृत्व एक अवलोकन **प्राचार्य डॉ. बबन पवार** | 163 |
| 40 | दलित महिलांचे शिक्षण आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रा डॉ कर्पे बाळासाहेब निवृत्ती | 165 |
| 41 | कामकरी स्त्रियांच्या समस्या किशोर रामदास टेंभुर्णे | 169 |
| 42 | डॉ. इंदुमती बोबडे : कार्य आणि कर्तृत्व डॉ. किशोर मारोती वानखडे | 174 |

'Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 261 (CCLXI)
ISSN : 2278-9308
November, 2020

# 'मुखेडच्या 'दशरथेश्वर' मंदिरावरील एकमेवाव्दितीय नायिकाप्रधान कामशिल्प'



प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के
संशोधन मार्गदर्शक,
प्रमुख, इतिहास विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,
भोकर, जिल्हा नांदेड.
arvindsontakke72@gmail.com

भारतीय कामशिल्पाची मीमांसा करताना इतिहासातील अनेक परिवर्तने आणि स्थित्यंतराचा विचार अपरिहार्य ठरतो. प्राचीन भारतीय संस्कृती ही सर्वसमावेशक होती. तिथ त्या वेळी प्रादेशिक आणि राजकीय असे सीमांचे काहीच बंधन नव्हते. तिचा प्रभाव कालपरत्वे कमी-अधिक प्रमाणात सर्व भारतभर अस्तित्वात होता. वंशविविधता व विविध धर्मश्रद्धा यांनी ती समृद्ध झाली होती. भारतीय मूर्तीकलेच्या उद्गमाबरोबरच भारतीय कामशिल्पास प्रारंभ झाला असावा, असे बहुतेक कलासमीक्षक मानतात; तथापि भारतीय शिल्पकलेच्या उद्गमाविषयी तज्ज्ञात एकमत आढळत नाही.(1) नवाश्मयुगीन व मध्याश्मयुगीन काळात डोंगरांच्या व टेकड्यांच्या आश्रयाने काही गुहेतून रंगीत चित्रकाम केलेले आढळून येते. त्याचा आणि भारतीय शिल्पकलेचा प्रत्यक्ष संबंध नसला, तरी कामशिल्पाशी संबंधित अशी काही चित्रे आढळून येतात. यातील काही संभोग क्रियेच्या चित्रणासोबतच एकूणच स्त्री चित्रणात जघनप्रदेश व स्तन यांना अवाजवी महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळे प्रागैतिहासिक कलेतही भारतात स्त्री या वर्ण्यविषयास असलेले महत्त्व दृग्गोचर होते आणि हाच विषय पुढील काळात मंदिर शिल्पातून हाताळलेला दिसतो.(2)

उद्देश:- भारतीय कामशास्त्र ग्रंथाची निर्मिती आणि कामशिल्पाची निर्मिती हे पुरुषप्रधान आहे, असे मानले जाते. परंतु कामशिल्पा अंतर्गत नायिकाप्रधान कामशिल्पाची निर्मिती झाल्याचे सिद्ध करणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

संशोधन पद्धती :- प्राथमिक साधनाच्या आधारे कामशास्त्राच्या दृष्टीकोनातून सदरील मूर्तीचे विश्लेषण केलेले आहे.

स्थान :- मुखेड हे ठिकाण महाराष्ट्र आणि तेलंगणा सीमेवर वसलेले तालुक्याचे गाव असून त्याचे 18°42'7.8768"N & 77°22'12.6696"E असे भौगोलिक स्थान आहे.

महत्वाचे शब्द:- कामशिल्प, युगल शिल्प, मैथुन, औपरिष्टक, चुंबन, आलिंगन, आसन ई.

संभोग म्हणजे 'समभोग', परस्परांचा किंवा एकमेकांचा एकमेकांनी समान मार्गांनी आनंद लुटण्यासाठी केलेला उपयोग. या ब्रम्हांडव्यापी शक्तीची अनेक वर्गातील रूपे आहेत. विचारांनी आकर्षित होणे म्हणजे वैचारिक संभोग, दृष्टा-दृष्ट होऊन आकर्षित होणे हा दृष्टी संभोग, स्पर्शाने आकर्षित होणे हा स्पर्श संभोग, वास घेऊन आकर्षित होणे हा घ्राण संभोग. दक्ष स्मृतीमध्ये संभोगाची आठ ठळक लक्षणे दिली आहेत. त्याना 'अष्टमैथुन' म्हटले आहे. गुरुत्वाकर्षणाच्या योगाने ब्रम्हांडातील अणुरेणू, चंद्र, तारे, सूर्य, पृथ्वी, जीवजंतू वगैरे एका ठराविक शिस्तबद्ध मार्गांनी मार्गक्रमण करण्यास बांधले गेले आहेत. प्रत्येक अणु मधील इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन व प्रोटॉन या महापरमाणुचा सुद्धा एकमेकाशी नित्य संभोग सुरू आहे. ते स्वत:

भोवती फिरत एकमेकांभोवती सुद्धा फिरतात. म्हणून ब्रह्मांडातील चंद्र, सूर्य, तारे, पृथ्वी स्वतःभोवती आणि एकमेकांभोवती सुद्धा फिरतात. इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन व प्रोटॉन याच्या आकर्षण - विकर्षण क्षमता हीची उत्पत्तीकर्ता ब्रम्हदेव आहे. वरील तिन्ही आणि चौथी संभोगशक्ती ही त्या देवतेची चार मुख कल्पिली आहेत. वरील तिघा महापरमाणूच्या योगानेच 'लय' (नाश) सुद्धा होतो. लयाची देवता महादेव, या देवतेच्या हातातील 'त्रिशूळ' म्हणजे वरील तीन महापरमाणु, म्हणूनच ही 'महादेवता' आहे. 'लय' झाल्याशिवाय 'उत्पत्तीला' अस्तित्व नाही. म्हणून लय करून उत्पत्तीसाठी क्षेत्र उपलब्ध करून देणारी, म्हणजेच शुभ करणारी म्हणून 'शंकर' (शं करोती इति शंकरः) अशा या महान दैवताची व्याख्या केलेली आहे.(3) भारतीय कामशिल्प हे हिंदू, बौद्ध आणि जैन या सर्व कलाकृती मध्ये पहावयास मिळतात. त्यात महत्वाची बाब म्हणजे बहुतांशी कामशिल्प ही केवळ शिवाच्या मंदिरावर पाहावयास मिळतात. यामागील महत्वाचे कारण म्हणजे लय आणि त्यानंतर उत्पत्तीसाठी क्षेत्र निर्माण करून देणारी, त्याचे ज्ञान देणारी 'देवता' म्हणून शिवाचा असलेला प्रमुख वाटा हेच होय. अर्थात निर्मिती आणि लय हे दोन्ही कार्य 'शिव' करीत असल्याने शिवमंदिरावर कामशिल्पांची निर्मिती झाली. भारतामध्ये या पवित्र कामभावनेचा प्रतीक स्वरूपात, शंकराच्या पिंडीचा देव भारतीयांनी शोधून काढला आहे. कामभावना ही अतिचंचल व प्राणीमात्रांना आजीव आच्छादून असते. कामभावनेवरील एकाग्र अवधानामुळे नर स्खलनशील असल्याने त्वरित निष्कासित होऊ शकतो. मात्र स्त्री उत्तरोत्तर उत्तेजित होत जाते.(4) त्यामुळे पुरुषाला उत्तेजित ठेवणे किंवा पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुषांना गृहीत धरून अधिकाधिक कामशिल्प निर्माण केलेली आहेत. तरीही काही कामशिल्प ही 'नायिकाप्रधान' असल्याचे दिसून येतात. त्यातील नायिकेची देहबोली, कार्यमग्नता यावरून असे कामशिल्प ओळखता येतात.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात 'दशरथेश्वर' नावाचे एक शिवमंदिर असून प्रस्तुत शिवमंदिराच्या अंतरंगात तीन आणि प्रत्यक्ष व्दारशाखेच्या उत्तरांगावर(5) दोन आणि देव कोष्टकाच्यावर एक अशी एकूण सहा कामशिल्प आहेत. 'केवळ मंदिराच्या बाह्यांगावर कामशिल्प असतात' या गृहितकाला छेद देणारे हे मंदिर असून मंदिराच्या सभामंडपामध्ये कामशिल्प असलेली अशी मंदिरे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. खिद्रापूरच्या 'कोपेश्वर' महादेव मंदिराच्या सभामंडपातील एका स्तंभावर कामशिल्प कोरलेले आहे. तद्वतच जालना जिल्ह्यातील अन्वा या ठिकाणी असलेल्या शिवमंदिराच्या सभामंडपातील स्तंभावर देशातील एकमेवाव्दितीय असे कामशिल्प कोरलेले आहे. या कामशिल्पाचा शोध संशोधकाने स्वतः लावलेला आहे. अशीच कामशिल्प वेरुळच्या 'कैलास' मंदिराच्या सभामंडपातील स्तंभावर कोरलेली आहेत. प्रस्तुत मंदिर पूर्वाभिमुख असून याच बाजूस त्याचे मुख्यप्रवेशव्दार आहे. तर दुसरे प्रवेशव्दार हे दक्षिणेस आहे. या प्रवेशव्दाराच्या ललाटबिंबावर गणेश मूर्ती आहे. त्याच्या उत्तरांगावर मध्यभागी शिवाची मूर्ती व त्याच्या दोन्ही बाजूला नायिकाप्रधान कामशिल्प कोरलेले आहे.

यातील प्रथम कामशिल्प हे 18.5 सेंमी बाय 16.5 सेंमी आहे. या कामशिल्पात युगलांनी आपला डावा पाय जोडीदाराच्या अंगाभोवती गुंडाळलेला असून दोघेही आपल्या उजव्या पायावर स्वतःचा तोल सांभाळत समागम करीत आहेत. जे कामशास्त्रीय ग्रंथांनुसार व्दिपादासन (स्थिररत) किंवा लतावेष्टीत आसन(6) या नावाने ओळखले जाते. प्रस्तुत शिल्पात नायकाने नायिकेच्या डाव्या पायाला हाताने आधार दिला असून समागम क्रीडेमध्ये सर्वाधिक योगदान नायिकेचे दिसून येत आहे. यात नायिका ही कामबिंदूच्या उच्चांकावर पोहोचली असून तिची शारीरिक हालचाल पाहता कामक्रीडेचा आनंद ती पूर्णपणे उपभोगत असल्याचे दिसत आहे. प्रस्तुत शिल्पातील नायिका नायकाच्या खांद्याचा डाव्या हाताने आधार घेत चुंबनादी क्रीडेसह समागम करीत आहे. नायिकेच्या पाठीवरील कण्याचा बाक हा एखाद्या पन्हाळी प्रमाणे भासत असून कामक्रीडेत नायकापेक्षा नायिकेने घेतलेला पुढाकार स्पष्ट जाणवतो.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 261 (CCLXI)
ISSN : 2278-9308
November, 2020

उत्तरांगावरील दुसरे शिल्प हे 18.5 सेंमी बाय 16 सेंमी आहे. हे शिल्प कामशास्त्रीय ग्रथातील औपरिष्टक[7] आसनातील संकर औपरिष्टक[8] असून नायिका नायकासोबत मुखमैथुन करीत आहे. प्रस्तुत शिल्पात नायकाने नायिकेचे दोन्ही हात धरलेले असून आपले उत्तेजित लिंग नायिकेच्या मुखात दिलेले आहे. या शिल्पामध्ये नायक तान देत नायिकेला मुखमैथुन करण्यास प्रवृत्त करत आहे. तर नायिका अगदी तन्मयतेने मुखमैथुन करण्यात मग्न दिसून येते. याचे शिल्पीने वास्तव शिल्पांकन केलेले आहे. या शिल्पामध्ये पाठीला कमालीचा बाक दाखविला असून शरीरशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार करता स्त्री सौष्ठत्वाची लक्षणे यथायोग्य दाखविली आहेत. त्यात मुखमैथुन करीत असलेल्या नायिकेच्या पाठीवरील स्नायू / मांसपेशी (Muscle) आणि घोटीव शरीर स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने कोरलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत शिल्पात नायिका ही पुढाकार घेताना दिसून येते. या शिल्पात असलेली नायिकेची कार्यकुशलता दृगोचर करण्यासाठी शिल्पकाराने तिचे दोन्ही पाय गुडघ्यात दुमडून ते जमिनी पासून वर उचललेले आहेत. जेणेकरून तिची हलचाल स्पष्ट जाणवावी.

मुखेडच्या दशरथेश्वर मंदिरातील सभामंडपाच्या स्तंभशीर्षावर तीन कामशिल्प आहेत. यातील प्रथम कामशिल्प 22.5 सेंमी बाय 19 सेंमी आहे. प्रस्तुत शिल्पामध्ये युगल स्थानकस्थिती मध्ये असून रतिपूर्व कामक्रीडेत मग्न आहेत. ज्यामध्ये नायकाने तिच्या स्तनाला स्पर्श केला असून तिने आपला डाव्या पाय किंचित वाकविला आहे, तर आपल्या दोन्ही हाताने नायकाचा चेहरा पकडून ती स्वतः जणू काही केशपाशगृह चुंबन[9] घेत आहे. यात रतिक्रीडेतील नायिकेचा सहभाग आणि पुढकार महत्वपूर्ण आहे.

व्दितीय शिल्प 28 सेंमी बाय 19 सेंमी असून हे शिल्प रतिपूर्व कामक्रीडा करणाऱ्या युगलाचे आहे. प्रस्तुत शिल्पात दोघेही तिर्यांक चुंबन[10] घेत असून चूषण चुबन[11] क्रियेमध्ये गुतलेले दिसतात. नायक आणि नायिका परस्पर पूरक मुख एकमेकासमीप येत चुबन घेत असून, दोघेही उजव्या अंगाने वाकलेली आहेत. या शिल्पाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे नायिका ही उचीने नायकाच्या बरोबरीची किंवा त्यापेक्षा किंचित जास्त उच असावी. कारण नायकापेक्षा नायिकेच्या शरीराला अधिक बाक दाखवण्यात आलेला आहे. तर अधरपान करीत असलेल्या या शिल्पामध्ये पाठमोरी उभी असलेली नायिका अधिक कामनीय आणि सक्रीय असल्याचे स्पष्ट दिसते. या सोबतच नायिकेने आपला उजवा पाय नायकाच्या पायात गुफलेला आहे.

सभामंडपात असलेले तृतीय कामशिल्प 23 सेंमी बाय 15 सेंमी आकाराचे असून व्दारशाखेच्या उत्तरांगावरील क्रमांक एकच्या शिल्पाप्रमाणेच असून या शिल्पातही कामक्रीडेत नायिकेचा सक्रीय सहभाग स्पष्ट दिसतो.

मंदिर गर्भगृहाच्या बाह्यांगावर तीन देवकोष्टक असून उत्तरेकडील देवकोष्टकाच्या उत्तर भागावर एक नायिका प्रधान कामशिल्प असून हे 11.5 सेंमी बाय 16.5 सेंमी इतक्या लहान आकाराचे शिल्प आहे. दक्षिण प्रवेश व्दाराच्या उत्तरांगावरील प्रथम क्रमांकाच्या शिल्पा प्रमाणेच हे शिल्प आहे. परंतु या शिल्पात केवळ नायिका एका पायावर उभी आहे. कामशास्त्रीय ग्रंथानुसार नायक नायिकेचा एक पाय उचलून तिचा दुसरा पाय तसाच जमिनीवर असताना समागम करीत असल्यास त्यास 'हरीविक्रम' म्हणतात.[12] 'रतिरत्नप्रदीपिका'[13] रतिकल्लोलिनी'[14] स्मरदीपिका'[15] यात प्रस्तुत आसनाला 'त्रिविक्रम' असे नाव दिलेले आहे. पंचसायकानुसार[16] या आसनाला 'त्रिपादासन' तर शृगाररसप्रबंधदीपिकेत[17] 'एकपादबध' असे नाव आहे. प्रस्तुत शिल्पात नायिकेने नायकाच्या उजव्या हाती आपला डावा पाय दिलेला असून नायिकेचा उजवा पाय नायकाच्या डाव्या पायासोबत समांतर आहे. दोघांचेही पाय गुढग्यात वाकलेले असून जिथे पाय टेकलेले आहेत तिथे पायाखाली एक वीट ठेवल्याप्रमाणे उंच ओटा आधारासाठी दिलेला आहे. स्वताचा तोल सांभाळण्यासाठी तिने डाव्या हाताने नायकाच्या खांद्यावरून मानेला आलिंगन घातले आहे; नायकाने आपले केस पूर्णपणे बांधलेले असून पाठीमागे अंबाडा (धुमील) गच्च बांधलेला आहे. तसेच उजव्या हाताने नायिकेने नायकाच्या केसात पूजा विधी प्रमाणे काही तरी गुफत आहे; तर नायकाचा डावा हात वरद मुद्रेत असून ही क्रिया तांत्रिक विधीशी संबंधित दिशा निर्देश करीत आहे.[17] त्या सोबतच नायिका

त्याच्या खालच्या ओठाचे तीव्र प्रेमानंदाने चुंबन घेत असून त्याच्या ओठावर दंतक्षत करीत आहे. आशा वेळी नायक नायिकेच्या वरील ओठाचे चुंबन घेत असल्यास त्यास 'उत्तरोष्ठ' चुंबन[18] असे म्हणतात. 'संपुटक'[19] चुंबनातील हा एक प्रकार आहे. प्रस्तुत शिल्पात अधरचुंबन[20] नायक घेत नसून नायिका घेत आहे. नायक स्थिर असून तुलनेने नायिकेची देहबोली सक्रीय सहभाग दर्शविते. प्रस्तुत मूर्तीचा आकार खूपच लहान असलातरी युगलाच्या अंग प्रत्यगाचे यथार्थ दर्शन कलाकाराने घडविलेले आहे.

मूर्तीशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी आपल्या 'सुरसुंदरी'[21] या पुस्तकात म्हटले आहे की, "मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरी या मनातील सारे विकार बाहेर ठेऊन मंदिरात प्रवेश करावा असे सुचवितात." हे तार्किकदृष्टीने तर शक्यच नाही, पण यास ग्रांथिक आधार ही नाही. अन्यथा मंदिराच्या बाह्यांगासोबतच मंदिराच्या सभामंडपातही कामशिल्प कोरलीच नसती. दशरथेश्वर मंदिरातील आणि मंदिरावरील कामशिल्प एक आशादायक चित्र प्रस्तुत करतात की, जीवनातील चार पुरुषार्थ यथायोग्य पध्दतीने पार पाडावेत त्यातील काम 'सकाम' असावा. कामाचा अतिरेक होता कामा नये. एव्हढेच नसून काम हाच मानव जीवनातील सर्वात मोठा घटक आहे. म्हणूनच लोकधर्मात कामप्रतीके निर्माण झाली. जीवनात सातत्य राखण्यासाठी याच कामाला पूजनीय मानणाऱ्या तांत्रिकांच्या साधनेचे हे चालुक्य कालीन मंदिर होते. त्यामुळे ही सारी कामशिल्प मंदिराच्या सभामंडपात आणि बाह्यांगावर ही कोरण्यात आलेली आहेत.

सारांश :-

1. कामशिल्पामध्ये प्रामुख्याने नायक हा कर्ता म्हणून दाखविला जातो, किंबहुना तसा समज आता पर्यंत प्रचलित आहे. परंतु दशरथेश्वर मंदिराच्या अंतर्गत आणि बाह्यभागावर नायिका ही सक्रिय (Active) दाखविल्याने ही कामशिल्प 'नायिकाप्रधान' असल्याचे सिद्ध होते.
2. 'मंदिरात प्रवेश करताना मनातील सारे विकार बाहेर ठेऊन मंदिरत प्रवेश करावा.' हे सुरसुंदरी संदर्भाने केलेले विधान निराधार ठरत असून चतुर्विध पुरुषार्थाचे पालन करीत आध्यात्म साधावा हे मंदिरातील सभा मंडपाच्या स्तंभावर असलेल्या कामाशिल्पातून स्पष्ट होते.
3. उत्तरांगावर कामशिल्प कोरलेले हे मराठवाडाच नाही तर मध्य भारतातील एकमेवाव्दितीय मंदिर आहे.
4. देवकोष्टकावरील कामशिल्प हे पूर्णतः तांत्रिक विधीशी संबधित शिल्प असून मंदिराच्या अंतर्गत व बाह्य भागावरील कामशिल्प पहाता हे तांत्रिकांचे 'साधना' मंदिर होते, तसेच देवकोष्टकावर कामशिल्प असलेले मराठवाड्यातील एकमेव मंदिर आहे. असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.
5. दाशरथेश्वर मंदिरावरील कामशिल्प हे प्रमाणाबध्द शरीर, तरतरीत सरळ नाक आणि नवतारुण्य असलेली युगल असल्याचे दिसून येते.
6. व्दारशाखेच्या उतरांगावरील व्दितीय शिल्प हे शरीरशास्त्राच्या अनुषगाने परिपूर्ण बनविण्यात आलेले असून नायकाने नायिकेचे दोन्ही हात धरून त्यांना ताण दिलेला आहे. तर नायिका ही त्याचे आव्हान आनंदाने स्वीकारत आहे. असे शिल्प ज्यात तिच्या पाठीवरील स्नायू स्पष्ट दिसत असून तिच्या पाठीचा बाक अधिक लक्षवेधक आहे. या उलट खजुराहो येथील जागतिक कीर्तीच्या कामाशिल्पात असलेले नायक – नायिका हे गोलघन शरीरयष्टीचे कोरलेले आहेत. त्या मुळे प्रस्तुत शिल्प आणि शिल्प क्रमांक सहा हे देशातील सुबक, भौमितीय आकारात प्रमाणबध्द कोरलेले त्या त्या श्रेणीतील सर्वात लघुशिल्प म्हणून एकमेवाव्दितीय शिल्प ठरावे.

ISSN : 2278-9308
November, 2020

संदर्भ :-

1. सु. र. देशपांडे, भारतीय कामशिल्प, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1986, पृ. 4
2. कित्ता.
3. हिंमतदादा मोरे, मनोवांच्छित संपत्ती, योगानंद प्रकाशन, पारोळा, जळगाव, 2006, पृ. 82 – 83
4. कित्ता. पृ. 82
5. गो. बं. देगलूरकर, मंदिर कसे पहावे, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2019, पृ. 27
6. रतिरहस्य, सम्पा. डॉ. श्रीरामानंद शर्मा, कृष्णदास अकादमी, वाराणसी, 1994, पृ.125; बाभ्रव्यकारिका, सम्पा. दलवीर सिंह चौहान, चौखम्बा संस्कृत आफिस, वाराणसी, 2005. पृ. 53
7. कामसूत्रम (9/24 – 33)
8. रतिरत्नप्रदीपिका (6/35-36); बाभ्रव्यकारिका, सम्पा. दलवीर सिंह चौहान, चौखम्बा संस्कृत आफिस, वाराणसी, 2005. पृ. 66
9. रतिकल्लोलिनी (255)
10. कामसूत्रम (2/3–11); अनंगरंग, सम्पा. डॉ. रामसागर त्रिपाठी, चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान, दिल्ली, 2004, पृ. 244, 250
11. शृंगाररसप्रबंधदीपिका (2/72)
12. डॉ. त्रिपाठी रामसागर, संपा. नागरसर्वस्वम (32/1), चौ. सं. प्रतिष्ठान, दिल्ली, 2004, पृ. 115; पं. दीक्षित मथुराप्रसाद, केलीकुतुहलम (8/73), कृष्णदास अकादमी वाराणसी, वि. सं. 2058, पृ. 76; डॉ. शर्मा रामानंद, व्याख्या; रतिरहस्य (10/35), कृष्णदास अकादमी वाराणसी, 1994, पृ. 126; डॉ. त्रिपाठी रामसागर, अनु. अनंगरंग (10/26), चौ. स. प्रतिष्ठान, दिल्ली, 2004, पृ. 306.
13. वैद्य श्री शास्त्री शंकर दत्त, अनु. रतिरत्नदीपिका (5/26), कृष्णदास अकादमी वाराणसी, 2002, पृ. 56.
14. डॉ. चव्हाण दलवीर सिंह, संपा; रतिकल्लोलिनी (269), चौ. सं. सि. ऑफिस वाराणसी, 2004, पृ. 116
15. डॉ. चव्हाण दलवीर सिंह, संपा. स्मरदीपिका(116), चौ.सं. सि. ऑफिस वाराणसी, 2004, पृ. 45.
16. डॉ. शर्मा रामानंद, व्याख्या; पंचसायक(7/11), कृष्णदास अकादमी वाराणसी,1995,पृ.107.
17. Devangana Desai, Erotic Sculpture of India a Socio-Cultural Study, Tata McGraw-Hill Publishing Company Limited, New Delhi. 1975, P. 137 – 145.
18. डॉ. चव्हाण दलवीर सिंह, संपा. शृंगाररसप्रबंधदीपिका (39), चौ. स. सि. ऑफिस वाराणसी, 2006, पृ. 109.
19. डॉ. त्रिपाठी रामसागर, अनु. अनंगरंग (9/17), चौ.स. प्रतिष्ठान, दिल्ली, 2004, पृ. 251.
20. पं. शर्मा वासुदेव, अनु. रंगेलरतीशास्त्र, नवजीवन प्रकाशन पुणे, 1971, पृ. 70 - 71.
21. गो. ब. देगलूरकर, सुरसुंदरी, भारतीय विद्या भवन, पुणे, 2004, पृ. 5 – 7
22. प्रत्यक्ष सर्वेक्षण. (किशोर बोरकर आणि श्री आदित्य फडके याचे सहकार्य लाभले.)


शिल्प क्रमांक 01


शिल्प क्रमांक 02


शिल्प क्रमांक 03


शिल्प क्रमांक 04


शिल्प क्रमांक 05


शिल्प क्रमांक 06